## || श्री स्वामी समर्थ ||

## || शिवलीलामृत : नित्य पाठाच्या बेचाळीस ओव्या (शिवलीलामृत सार)|

|| ॐ नमोजी शिवा अपरिमिता || आदि अनादि मायातीता || पूर्ण ब्रह्मानंदा शाश्वता || हेरंबताता जगद्गुरु ||६१|| ज्योतिर्मयस्वरूपा पुराणपुरुषा || अनादिसिद्धा आनंदवनविलासा || मायाचक्रचाळका अविनाशा || अनंतवेषा जगत्पते ||६२||जयजय विरूपाक्षा पंचवदना || कर्माध्यक्षा शुद्ध चैतन्या || मनोजदमना मनमोहना || कर्ममोचका विश्वंभरा ||६३||जेथे सर्वदा शिवस्मरण || तेथे भुक्ति मुक्ति आनंद कल्याण || नाना संकटे विघ्ने दारुण || न बाधिती कालत्रयी ||६४||संकेते अथवा हास्येकरून || भलत्या मिषे घडो शिवस्मरण || न कळता परिस लोहालागुन || झगडता सुवर्ण करीतसे ||६५||न कळत प्राशिता अमृत || अमर काया होय यथार्थ || औषध नेणता भक्षिता || परी रोग हरे तत्काळ ||६६||जय जय मंगलधामा || निजजनतारक आत्मारामा || चराचरफलांकित कल्पद्रुमा || नामा अनामा अतीता ||६७||हिमाचलसुतामनरंजना || स्कंदजनका शफरीध्वजादहना || ब्रह्मानंदा भाललोचना || भवभंजना महेश्वरा ||६८||हे शिवा वामदेवा अघोरा तत्पुरुषा ईशाना ईश्वरा || अर्धनारीनटेश्वरा || गिरुजारंगा गिरीशा ||६९||धराधरेंद्रमानससरोवरी || तू शुद्ध मराळ क्रीडसी निर्धारी || तव अपार गुणासी परोपरी || सर्वदा वर्णिती आम्नाय ||२७०||नकळे तुझे आदिमध्यावसान || आपणचि सर्व कर्ता कारण || कोठे प्रगटशी याचे अनुमान || ठायी न पडे ब्रह्मादिका ||७१|| जाणोनि भक्तांचे मानस || तेथेंचि प्रगटशी जगन्निवास || सर्वकाळ भक्तकार्यास स्वांगे उडी घालिसी ||७२|| सदाशिव ही अक्षरे चारी || सदा उच्चारी ज्याची वैखरी || तो परमपावन संसारी || होऊनि तारी इतरांते ||७३|| बहुत शास्त्रवक्ते नर || प्रायश्चित्तांचे करिता विचार || परी शिवनाम एक पवित्र || सर्व प्रायश्चिता आगळे ||७४|| नामाचा महिमा अद्भुत || त्यावरी प्रदोषव्रत आचरत || त्यांसी सर्व सिद्धि प्राप्त होत || सत्य सत्य त्रिवाचा ||७५|| जयजयाजी पंचवदना || महा पापद्रुमनिकृंतना || मदमत्सरकाननदहना || निरंजना भवहारका ||७६|| हिमाद्रिजामाता गंगाधरा || सुहास्यवदना कर्पूरगौरा || पद्मनाभमनरंजना त्रिनेत्रा || त्रिदोषशमना त्रिभुवनेशा ||७७|| नीलग्रीवा अहिभूषणा ||

नंदिवाहना अंधकमर्दना ॥ दक्षप्रजापति मखभंजना ॥ दानवदमना दयानिधे ॥७८॥ जय जय किशोर चंद्रशेखरा ॥ उर्वीधरेंद्रनंदिनीवरा ॥ त्रिपुरमर्दना कैलासविहारा ॥ तुझ्या लीला विचित्र ॥७९॥ कोटि भानुतेजा अपरिमिता ॥ विश्वव्यापका विश्वनाथा ॥ समाधिप्रिया भुतादिनाथा ॥ मूर्तामूर्ता त्रयीमूर्तै ॥२८०॥ परमानंदा परमपवित्रा ॥ परात्परा पंचदशनेत्रा ॥ पशुपते पयःफेनगात्रा ॥ परममंगला परब्रह्मा ॥८१॥ जय जय श्रीब्रह्मानंदमूर्ती ॥ तू वेदवंद्य भोळा चक्रवर्ती ॥ शिवयोगीरूपे भद्रायूप्रती ॥ अगाध नीती कथिलीस ॥८२॥ जय जय भस्मोध्दूलितांगा ॥ योगिध्येया भक्तभवभंगा ॥ सकळजनरआराध्यलिंगा ॥ नेई वेगी तुजपाशी ॥८३॥ जेथे नाही शिवाचे नाम ॥ तो धिक् ग्राम धिक् आश्रम ॥ धिक् ग्रहपुर उत्तम ॥ आणि दानधर्मा धिक्कार ॥८४॥ जेथे शिवनामाचा उच्चार ॥ तेथे कैचा जन्ममृत्युसंसार ॥ ज्यांसी शिव शिव छंद निरंतर ॥ त्यांही जिंकिले कळिकाळा ॥५॥ जयाची शिवनामी भक्ती ॥ तयाची सर्व पापे जळती ॥ आणि चुके पुनरावृत्ती ॥ तो केवळ शिवरूप ॥८६॥ जैसे प्राणियांचे चित्त ॥ विषयी गुंते अहोरात ॥ तैसे शिवनामी जरी लागत ॥ तरी मग बंधन कैचे ॥८७॥ कामगजविदारकपंचानना ॥ क्रोधजलदविध्वंसप्रभंजना ॥ लोभांधकार चंडकिरणा ॥ धर्मवर्धना दशभुजा ॥८८॥ मत्सरविपिनकृशाना ॥ दंभनगभंदका सहस्त्रनयना ॥ लोभमहासागरशोषणा ॥ अगस्त्य महामुनिवर्या ॥८९॥ आनंदकैलासविहारा ॥ निगमागमवंद्या दीनोद्धारा ॥ रुंडमालांकितशरीरा ॥ ब्रह्मानंदा दयानिधे ॥२९०॥ धन्य धन्य तेचि जन ॥ जे शिवभजनी परायण ॥ सदा शिवलीलामृत पठण ॥ किंवा श्रवण करिती पै ॥९१॥ सूत सांगे शौनकांप्रति ॥ जे भस्म रुद्राक्ष धारण करिती ॥ त्यांच्या पुण्यासी नाही गणती ॥ त्रिजगती धन्य ते ॥९२॥ जे करिती रुद्राक्ष धारण ॥ त्यांसी वंदिती शक्रद्रुहिण ॥ केवळ तयांचे घेता दर्शन ॥ तरती जन तत्काळ ॥९३॥ ब्राह्मणादि चार वर्ण ॥ ब्रह्मचर्यादि आश्रमी संपूर्ण ॥ स्त्री बाल वृद्ध आणि तरुण ॥ याही शिवकीर्तन करावे ॥९४॥ शिवकीर्तन नावडे अणुमात्र ॥ तो अंत्यजाहूनि अपवित्र ॥ लेइले नाना वस्त्रालंकार ॥ तरी ते केवळ प्रेतचि ॥९५॥ जरी भक्षिती मिष्टान्न ॥ तरी ते केवळ पशूसमान ॥ मयूरांगीचे व्यर्थ नयन ॥ तैसे नेत्र तयांचे ॥९६॥ शिव शिव म्हणता वाचे ॥ मूळ न राहे पापाचे ॥ ऐसे माहात्म्य शंकराचे ॥ निगमागम वर्णिती ॥९७॥ जो जगदात्मा सदाशिव ॥ ज्यासि वंदिती कमलोद्भव ॥ गजास्य इंद्र माधव ॥ आणि नारदादि योगींद्र ॥९८॥ जो जगद्गुरु ब्रह्मानंद ॥ अपर्णाहृदयाब्जमिलिंद ॥ शुद्ध चैतन्य जगदादिकंद ॥ विश्वंभर दयाब्धी ॥९९॥ जो पंचमुख

दशनयन ॥ भार्गववरद भक्तजीवन ॥ अघोर भस्मासुरमर्दन ॥ भेदातीत भूतपती ॥३००॥ तो तू स्वजनभद्रकारक ॥ संकटी रक्षिसी भोळ्या भाविका ॥ ऐसी कीर्ति अलोलिका ॥ गाजतसे ब्रह्मांडी ॥१॥ म्हणोनि भावे तुजलागून ॥ शरण रिघालो असे मी दीन ॥ तरी या संकटातून ॥ काढूनि पूर्ण संरक्षी ॥२॥ ब्रह्मानंद म्हणे श्रीधर ॥ ह्या बेचाळीस ओव्या समग्र ॥ शिवलीलामृताचे होय सार ॥ श्रोती निरंतर परिसाव्या ॥३॥ सकळ शिवलीलामृताचे ॥ आणि ह्या बेचाळीस ओव्यांचे ॥ श्रवण पठण केल्याचे ॥ फळ असे समान ॥४॥ जेवी इक्षुरस गाळुनी ॥ शर्करा काढिजे त्यांतुनी ॥ तेवीच हे शिवलीलेतुनी ॥ सार काढिले सज्जनार्थ ॥५॥ कोणी व्यवहारी गुंतत ॥ म्हणोनि वाचवेना सर्व ग्रंथ ॥ कित्येक ते आळस करित ॥ ग्रंथ विस्तृत म्हणोनिया ॥६॥ हे जाणोनिया अंतरात ॥ शंकरआज्ञे नित्य पठणार्थ ॥ श्रीशिवलीलेच्या सारभूत ॥ ऐशा ह्या ओव्या रचियेल्या ॥७॥ भोळा चक्रवर्ती उदार ॥ भक्तवत्सल कर्पूरगौर ॥ तारावया जन समग्र ॥ नाना उपाय करितसे ॥८॥ तो दीनांचा कनवाळू ॥ नानारीती करीत सांभाळू ॥ परी हे दुर्जन कृतघ्न केवळू ॥ मुखे नामही न घेती पा ॥९॥ शिवनाम मुखी असावे म्हणोन ॥ साधुसंत करिती यत्न ॥ परी हे सर्व अति मूर्ख जन ॥ प्रपंची गुंतोन पडताती ॥३१०॥ तरणिउदयापासून ॥ अस्तमानापर्यंत अनुदिन ॥ निंदावाद मुखातून ॥ परी शिवनाम न येचि ॥११॥ यालागी सज्जनालागुनी ॥ विनवितो उभय हस्त जोडोनी ॥ शिवलीलामृत पठणेकरूनी ॥ मोक्ष जोडुनी घेईजे ॥१२॥ नित्य समस्त नोहे पठण ॥ तरी बेचाळीस ओव्या संपूर्ण ॥ वाचिता शुद्धभावे करून ॥ मनोरथ पूर्ण होतील ॥१३॥

---

॥ श्री गुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

|| श्री स्वामी समर्थार्पण मस्तु||